# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 20/02/2024 (मंगळवार) सायंकाळ

---

## अवैध रेती चोरी करणाऱ्या आरोपीस अटक

## नागपूर ग्रामीण पोलीसांची कार्यवाही

दिनांक २०/०२/२०२४ चे ०४.१० वा. ते ०४.५० वा. दरम्यान पोलीस स्टेशन खापरखेडा येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना मुख्यबिरव्दारे खबर मिळाली की, पोलिस ठाणे खापरखेडा हद्दीतील ०१ किमी अंतरावर शहंशा बार समोर अवैधरीत्या विनापरवाना रेतीची ट्रॅक्टर ट्रॉली व्दारे चोरटी वाहतुक होत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहितीवरून पोस्टे खापरखेडा स्टाफ यांनी नमुद घटनास्थळी नाकाबंदी केली असता **आरोपी नामे– १) विजय गणपत परतेकी वय ४५ वर्ष रा. वार्ड क्र. ०४ आबादी खापरखेडा ता. सावनेर** (चालक) हा फरार **मालक नामे– २) स्वप्नील रामदासजी तरेकर वय अंदाजे ३५ वर्षे रा. इंदिरानगर आबादी खापरखेडा ता सावनेर** याचे सांगितल्या वरून अण्णा मोड ते कोराडी कडे जाणाऱ्या रोडवर असलेल्या कोलार नदीच्या पात्रातून सोनालीका कंपनीचा निळा रंगाचा ट्रॅक्टर मुंडा क्र. एम.एच. २९. बी.वी. ७३७९ आणि बिना क्र. ची ट्रालीनी अवैध्यरित्या बिना परवाना रेतीची चोरटी वाहतूक करताना मिळून आल्याने आरोपीच्या ताब्यातून १) सोनालीका कंपनीचा निळा रंगाचा ट्रकटर मुंडा क्र. एम.एच. २९. बी.वी. ७३७९ किंमती अंदाजे २,००,०००/—रू, २) विना क्रंमाकाची लाल रंगाची ट्राली किंमती अंदाजे १,००,०००/—रू, .३) अंदाजे ०१ ब्रास रेती किंमती ४,०००/—रु असा एकुण ३,०४,०००/—रू चा माल जप्त करण्यात आला आहे. सदर आरोपीतांनी कोलार नदीच्या पात्रातुन अवैध्यरित्या रेतीची उतखन्न करुन शासनाचा महसुल बुडवण्याच्या उद्देशाने विनापरवाना रेतीची वाहतुक करतांना मिळुन आल्याने आरोपींविरूद्ध कलम ३७९, १०९ भा.द.वी. सह कलम ४८ (७) (८) महाराष्ट्र जमिन महसुल अधिनीयम १९६६, सह कलम ४, २१ खनीज अधिनीयम १९५७, सहकलम ३ सार्वजनीक मालमत्तेचे नुकसान १९८४ अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

सदरची कार्यवाही नागपुर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. हर्ष ए. पोद्दार, अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनात खापरखेडा येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक श्री. धनाजी जळक पोहवा विठ्ठल वंजारी, नापोशि मुकेश वाघाडे, पोशि आनंद देवकते, चालक सफौ विनोद दायमा यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर